## बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरातीचा मसुदा

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यातील सेठ ऐ.जे.बी. महानगरपालिका कान नाक घसा रुग्णालयाच्या आस्थापनेवरील 'कर्णचिकित्सक आणि वाक्उपचार तज्ञ' वर्ग(ब) या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेले अनूसूचित रिक्त पद भरण्यासाठी विहित अर्हताधारण करणा-या उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अर्ज स्विकारण्याचा दिनांक:- <u>१७.०२.२०२३</u> अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक <u>१५.०३.२०२३</u>**
**पदाचे नांव/वर्ग:- कर्णचिकित्सक आणि वाक्उपचार तज्ञ (वर्ग-ब) एकूण रिक्त पद – ०१**

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला/ अराखीव | एकूण | अर्ज स्विकारण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ | प्रमुख वैद्यकीय अधिकारी, सेठ ऐ.जे.बी. महानगरपालिका कान, नाक, घसा रूग्णालय, ७, महर्षी दधीची मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१ |
| एकूण | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ | |

**अ) शैक्षणिक अर्हता** :-
1) उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापिठाची ऑडिओलॉजी आणि स्पीच थेरपि (Audiology & Speech Therapy ) ही पदवी धारण करणारा असावा.
2) उमेदवाराने वाक् श्रवण उपचार किंवा कर्णबधिर क्लिनीक मध्ये काम केल्याचा किमान एक वर्षांचा अनुभव असावा.
3) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान ५० गुणांची मराठी प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तिर्ण असणे आवश्यक आहे.
4) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्या करीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी किंवा वापरा बाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.
तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराकडे सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी परिक्षा नेमणुकीच्या दिनांका पासून दोन वर्षांच्या आत उत्तिर्ण होणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**ब) वयोमर्यादा :-**
अगोदर महानगरपालिकेच्या सेवेत नसल्यास उमेदवाराचे वय ३८ वर्षां पेक्षा जास्त असता कामा नये (मागासवर्गिय उमेदवारांच्या बाबतीत वय ४३ वर्षांपेक्षा अधिक असता कामा नये)

**क)वेतनश्रेणी :- रु. ३५४००- ११२४०० + अनुज्ञेयभत्ते दरमहा (एम२१)**

**ड) दिव्यांग आरक्षण:-**
सदर पदा साठी दिव्यांग आरक्षण नाही तथापी दिव्यांग उमेदवार सर्वसाधारण गटातून अर्ज करू शकतात. मंजूरी क्र.सह आ(सा.प्र)/३००/ दि: २३/०५/२०२२ अन्वये खालील दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती/ उमेदवार सदर पदा करिता अर्ज करण्यास पात्र आहेत.
अ) OA=One Arm एक हात, OL=One Leg एक पाय, BL=Both Leg दोन्ही पाय, LC=Leprosy Cured कुष्ठरोग मुक्त, Dw=Dwarfism वाढ खुंटणे, AAV=Acid Attack Victims ॲसिड हल्ला बळी.
ब) SLD= Specific Learning disability विशिष्ठ शिक्षण घेण्यास असमर्थ
क) MD=Multiple Disabilities involving एकाधिक व्यक्तिमत्व विकास (अ) व (ब) अंतर्भूत

**इ) निवडीचे निकष व कार्य पध्दती-**

| अ.क्र | तपशील | एकूण गुण | देण्यात येणारे गुण |
|---|---|---|---|
| 1 | मान्यता प्राप्त विद्यापिठाची ऑडिओलॉजी आणि स्पीच थेरापि ( Audiology & Speech Therapy ) पदवी. | १० गुण | विद्यापीठाच्या अंतिम पदवी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या टक्केवारीच्या प्रमाणात.<br>उदा- जर उमेदवाराला ऑडिओलॉजी आणि स्पीच थेरपीच्या अंतीम वर्षाची पदवी परिक्षेत १००० गुणां पैकी ८०० गुण मिळाले असतील तर त्याला १० गुणां पैकी ८ गुण देण्यात येतील. |
| 2 | वाक्श्रवण उपचार किंवा कर्णबधिर क्लिनीक मध्ये काम केल्याचा किमान एक वर्षांचा अनुभव | १० गुण | १ वर्षांच्या किमान अनुभवासाठी गुण नाहीत. परंतु पुढील प्रत्येक वर्षासाठी २ गुण व जास्तीत जास्त १० गुण देण्यात येतील. |
| | **एकूण गुण** | **२० गुण** | |

उपरोक्त २० गुणां पैकी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड यादी तयार करण्यात येईल.उमेदवाराने अंतिम वर्षाची पदवी परिक्षा दुस-या प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास, अंतिम वर्षाच्या पदवी परिक्षेत उमेदवाराने प्राप्त केलेल्या एकूण गुणांमधून १० गुण वजा केले जातील. तिस-या प्रयत्नात उत्तीर्ण झाला असल्यास, परिक्षेतील एकूण गुणां मधून २० गुण वजा करण्यात येतील व ३ पेक्षा अधिक प्रयत्नात पदवी परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा भरती साठी विचार केला जाणार नाही.

समान गुण धारण करणा-या अर्हताधारक उमेदवारांना जन्मतारखेनुसार वयोजेष्ठतेने प्राधान्य देण्यात येईल.

**फ) <u>उमेदवाराने प्रमाणपत्र पडताळणी साठी उपस्थित राहण्याचे ठिकाण</u>:-**

| अ.क्र. | प्रवर्ग | ठिकाण | तारीख व वेळ |
|---|---|---|---|
| 1 | खुला | प्रमुख वैद्यकीय अधिकारी,<br>सेठ ऐ.जे.बी. महानगरपालिका कान, नाक, घसा रूग्णालय,<br>७, महर्षी दधीची मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१ | दि. ०५.०४.२०२३<br>वेळ: सकाळी ११ ते दुपारी ४.०० वाजे पर्यंत |

**<u>सर्वसाधारण अटी</u>:-**

1. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनूसार नेमणूक करण्यात येतील. तथापि, निवड यादी कोणत्याही वेळी पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अधिकार मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
2. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या व अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.
3. अर्ज विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व विहित दिनांका नंतर प्राप्त झालेले तसेच अपूर्ण माहितीचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
4. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचा-याला वर नमुद केलेल्या पदाकरीता अर्ज करावयाचा असेल तर, त्याने/तिने त्याच्या/तिच्या खातेप्रमुखाच्या ना-हरकत प्रमाणपत्रासह विहित मुदतीत अर्ज करणे आवश्यक आहे.
5. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरी सह अर्जावर नमुद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या ४ अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवारा जवळ ठेवणे आवश्यक आहे.
6. अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतींचे (छायांकीत प्रतींसाठी वापरण्यात येणा-या) लिगल आकारातील असावे.
7. अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदीत पदांच्या सर्व अर्हता व अटी पुर्ण करतात, उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
8. उमेदवारांचा पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा व भ्रमणध्वनी क्रमांक व इ-मेल आयडी अचूक असावा.

9. उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला/ जन्म दाखला/अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे, व्यावसायिक अर्हता,संबंधित गुणपत्रिका,सक्षम अधिका-यांनी दिलेले जाती प्रमाणपत्र,जाती वैधता प्रमाणपत्र,अनुभवाचे प्रमाणपत्र यांच्या साक्षांकीत झेरॉक्स प्रतीं अर्जासोबत सादर कराव्यात.
10. विवाहीत महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे.तसेच ते नसल्यास विवाहीत महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
11. उमेदवार एकापेक्षा अधिक प्रयत्नात अंतिम वर्षाची पदवी/पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण झाला असल्यास सर्व प्रयत्नांच्या गुणपत्रिकेच्या साक्षांकीत झेरॉक्स प्रतीं सोबत जोडणे आवश्यक आहे अन्यथा त्या उमेदवारांचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
12. सर्व पदावरील उमेदवारांना महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर.वही-२००० प्र.क्र.१७/२०००/२०१२ दि.०१.०७.२००५ अन्वये दि.२८.०३.२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही. तसे विहीत नमुन्यात रु.१०० चे स्टँप पेपरवर नोटराईज्ड केलेले लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.(अविवाहित अर्जदारानुसुध्दा सदरचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने/तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा.)
13. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.
14. निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या1 महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल,किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) बंधपत्र (Surety Bond) सादर करावे लागेल. सदर सुरक्षित अनामत रक्कम भरुन सुध्दा महानगरपालिकेमध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास किंवा काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांना भरलेली अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क राहणार नाही.
15. टपालाद्वारे पाठविलेले अर्ज, विहित मुदतीत अर्ज स्विकारण्याच्या ठिकाणी प्राप्त न झाल्यास किंवा उशिरा प्राप्त झाल्यास सदर अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
16. पोस्टाच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाला तर त्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेवर राहणार नाही.
17. उमेदवारांना प्रमाणपत्रे पडताळणीसाठी नियोजित स्थळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
18. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
19. जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार कार्यालयात नाव नोंदणी केलेली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकीत छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्य क आहे.
20. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्ती नंतर बृहन्मुंबई महानगरपालिका सेवानियम, १९८९ तसेच बृहन्मुंबई महापालिका सेवा वर्तणूक नियम,१९९९ लागू होतील.निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू होईल मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन नियम (१९५३) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधि योजना लागू होणार नाही
21. सदर भरती अंतर्गत नियुक्ती ३ वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व ३ वर्षांनंतरचे सेवासातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबुन असेल.
22. शासन निर्णय क्र.संकिर्ण/२००७/पडताळणी/नवि-26 दि. २१.११.२००७, तसेच,शासन परिपत्रक क्र.याचिका-३०१३ /प्र.क्र.१२० नवि. मंत्रालय दि. १९.११.२०१४ मध्ये दिलेल्या निदेशानुसार अन्वये निवड झालेल्या उमेदवारा विरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच उमेदवाराची सबंधित पदावर नेमणूक केली जाईल.
23. उमेदवार नोकरी करीत असल्यास,पूर्वीच्या नियोक्त्याचे नाहरकत प्रमाणपत्र' जोडलेले असावे.
24. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे सेवानिवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही.
25. बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये मागासवर्गीय आरक्षणाचा लाभ घेऊन कार्यरत असलेल्या उमेदवाराकडे नियुक्तीच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन निर्णय क्र.बीसीसी/२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६बी दि.१२.१२.२०११ नुसार नियुक्तीनंतर सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याला जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून त्यास तात्पुरती नियक्ती देण्यात येईल. तथापि, नियुक्तीनंतर एक महिन्याच्या आत उमेदवाराने संबंधित पडताळणी समितीकडे दावा दाखल करून त्याबाबतची पोंचपावती नियुक्ती प्राधचिका-यांना सादर करणे आवश्यक आहे मागासवर्गीय कर्मचा-याने जात पडताळणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे

सादर करून संबंधित पडताळणी समितीकडून त्याची पोचपावती सादर न केल्यास, तसेच त्यांनी सादर केलेले जात प्रमाणपत्र संबंधित जात प्रामणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविल्याचे कळविण्यात आल्यास त्याक्षणी त्यांना कोणतीही सूचना न देता / त्यांच्याविरुध्द कोणतीही खात्यातंर्गत चौकशीची कारवाई न करता त्यांचे नियुक्तीचे आदेश त्वरीत रद्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

26. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
27. अर्ज सादर करण्याची पध्दत:-
    पात्रता निकषांची पुर्तता करणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रतींसह जाहिरातीत नमूद केलेल्या ठिकाणी टपालाद्वारे किंवा वैयक्तिकरित्या पाठविणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत
28. निवड समितीने तयार केलेली निवडसूची 1 वर्षासाठी किंवा नविन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांका पर्यंत या दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य ठरेल. त्यानंतरही निवड सूची व्यपगत होईल

**<u>विशेष सूचना</u>:-**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/ प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
2. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
3. मध्यस्थ/ठक/मुंबईमहानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनांपासून सावध राहण्याची उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.
4. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
5. सेवायोजन कार्यालये/ प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित झेरॉक्स प्रतींसह सादर करणे आवश्यक आहे.

**सही /-**
**प्रमुख वैद्यकीय अधिकारी**
**सेठ ऐ.जे.बी. बृमपा कान, नाक, घसा रूग्णालय**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**अर्जाचा नमुना**

| **पारपत्र आकारातील फोटो** |
|---|

पदाचे नाव:- कर्णचिकित्सक आणि वाक्‌उपचार तज्ञ
(हि माहिती अर्जाच्या लिफाफ्यावरही लिहिणे आवश्यक आहे)

प्रति,
कार्यकारी आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य खाते
बृहन्मुंबई महानगरपालिका

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामधे वर नमूद केलेल्या पदा करीता दि............च्या जाहिराती नुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे.

1. (अ) संपूर्णनाव (आडनाव प्रथम):-.................................................................................
(ब) वडिलांचे/पतीचे संपूर्ण नाव:-................................................................................
(क) विवाहा पूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता):-..........................................................................

2. (अ) पत्ता:-.................................................................................
.................................................................................
(ब) भ्रमणध्वनी क्रमांक:-....................................ई-मेल...................................
3.लिंग:- पुरुष: स्त्री:

4. (अ) जात.....................पोटजात......................प्रवर्ग...............................
(ब) जातवैधता प्रमाणपत्र: आहे/ नाही

5. जन्मदिनांक:दिनांक________ महिना _________ वर्ष __________
दि...............रोजी असलेले वय............वर्षे.............महिने............दिवस

6. शैक्षणिक अर्हता:-

| शैक्षणिक अर्हता | शालांत परिक्षा मंडळ/ विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | उत्तीर्णतेचे प्रयत्न | टक्केवारी | एस.एस.सी/ एच.एस.सी परिक्षेतील मराठी विषयातील गुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | | मराठी विषयातील प्राप्त गुण | ५० पैकी |
| एस.एस.सी | | | | | | | |
| एच.एस.सी (सायन्स) | | | | | | | |
| ऑडिओलॉजी आणि स्पीच थेरापि पदवी | | | | | | | |

7. संगणक विषयक ज्ञान: एम.एस.सी.आय.टी किंवा शासनाने विहित केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र :- आहे/ नाही

8. अनुभव:- ................................................................................

9. स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्णपत्ता:-................................................................................

10. सेवायोजन कार्यालयाचे नोंदणीपत्र असल्यास

त्याचा क्रमांक व दिनांक, नुतणीकरणाचा दिनांक......................................................................

11. (अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का? :-......................................................................
(ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा
व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी:-..............................................

12. उमेदवारा विरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का
असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा:- ....................................................................

13. सध्या अर्जदार इतरत्र नोकरीस आहे का? असल्यास त्याबाबतचा तपशील देऊन,
सध्याच्या नियोक्त्याचे ना-हरकतप्रमाणपत्र जोडावे:-...................................................................

उंची..........फूट.......इंच,
वजन.........किलोग्रॅम,
शरिराची ठेवण: किरकोळ/मध्यम/सुदृढ,
वर्ण........
नेत्रवर्ण........
वैयक्तिक खुण..............................

मी यान्वये प्रतिज्ञा पूर्वक असे जाहिर करते की, वरील माहिती जाणिवपूर्वक तसेच विश्वास पूर्वक दिली असून, खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हते नुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्या मूळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास, किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्या विरुध्द कायदेशील कारवाई करु शकते याची मला जाणिव आहे.

सोबत: 1) आपला/आपली विश्वासू,
2)

दिनांक: अर्जदाराची सही/-
ठिकाण: (अर्जदाराचे नाव)